**MHKO100003572025**

## नियमीत दिवाणी दावा क्र.३७/२०२५ मधील निशाणी क्र.१३ वर आदेश
## (जिजा बुगडे वि. प्रकाश बुगडे)

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांच्या विरुध्द झालेला "विना कैफीयत व म्हणणे " आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांना मुतखडा व पोटाच्या विकाराचा त्रास असून त्यांच्यावर दोन वेळा मुतखडयाच्या व पोटाच्या तक्रारीवरून शस्त्रक्रिया झाली आहे. त्यामुळे त्यांना बरेच दिवस घरातून बाहेर पडता आले नाही. प्रतिवादी क्र. २ ही शिक्षण घेत आहे. या सर्व कारणामुळे वकीलांना भेटून आवश्यक ती माहिती देता आली नाही. तसेच आवश्यक ती कागदपत्रे संबंधित कार्यालयातून वेळेत उपलब्ध झाली नाहीत. वादीचे दाव्यास मुदतीत कैफियत व म्हणणे दयावे लागते याचे त्यांना कायदेशीर ज्ञान नव्हते. कैफियत व म्हणणे नाहीचा आदेश रद्द न केल्यास त्यांचे कायदेशीर हक्कास बाधा पोहोचणार आहे. प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे दाखल करून घेतल्यास दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय होण्यास मदत होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**२.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दिले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील मजकूर खोटा आहे. प्रतिवादी क्र.१ हा अर्जदार हिचा पती असून त्यानी वादीस पोटगी दिलेली नाही. तसेच कैफियत व म्हणणे देण्यास विनाकारण विलंब केला आहे. वादीला कोर्टात हेलपाटे घालावे

लागत आहेत. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचा झाल्यास रू.२०००/- कॉस्ट करण्यात यावी.

३. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादी यांनी सदरचा दावा वाटप व पोटगी ठरवून मिळणेकरीता दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी हे दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर न्यायालयात दिनांक ०९/०१/२०२५ रोजी हजर झाले. प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत कैफियत दिली नाही. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १७/०९/२०२५ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांच्या अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करण्यास बराच उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांच्यावर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) प्रतिवादी क्र. १ व २ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्यांची निशाणी १३ च्या अर्जासोबत दिलेली कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2026.01.13
13:08:39 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १२/०१/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज